स्थायी समितीच्या **मंगळवार दिनांक 11–12–2018** रोजी **दुपारी 12–00** वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## उपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | मा. श्री.विरेन्द्र उर्फ विक्की घनश्यामदास कुकरेजा | सभापती |
| 2. | मा. श्री. मनोज दशरथ सांगोळे | सदस्य |
| 3. | मा. श्री.महेश केशवराव महाजन | सदस्य |
| 4. | मा. सौ. सोनाली शालीक कडु | सदस्या |
| 5. | मा. सौ. मंगला शशांक खेकरे | सदस्या |
| 6. | मा. सौ. हर्षला मनोज उर्फ मोरेश्वर साबळे | सदस्या |
| 7. | मा. श्री. नागेश महादेव मानकर | सदस्य |
| 8. | मा. सौ. कल्पना राम कुंभलकर | सदस्या |
| 9. | मा. सौ. अर्चना विवेक पाठक | सदस्या |
| 10. | मा. सौ. विद्या राजेश कन्हेरे | सदस्या |
| 11. | मा. सौ. अभिरूची अनिल राजगिरे | सदस्या |
| 12. | मा. श्री. भुट्टो जुल्फेकार अहमद | सदस्य |
| 13. | मा. सौ. मंगला योगीराज लांजेवार | सदस्या |

## अनुपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | मा. श्री.सुनिल दुलीचंद हिरणवार | सदस्य |
| 2. | मा. श्री.शेषराव शंकरराव गोतमारे | सदस्य |
| 3. | मा. सौ. मनिषा चक्रधर अतकरे | सदस्या |

## उपस्थित अधिकारी

1. श्री रविन्द्र ठाकरे, अति. आयुक्त (3) (शिक्षण व आरोग्य)
2. श्री. हरीश दुबे, निगम सचिव

मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

**ठराव क्रमांक ४३०:–** प्रभाग क्रं. १६ 'अ' अंतर्गत लोकमत चौक ते हम्पीयार्ड रोड
**{लोककर्म झोन १}** (बलराज मार्ग) या मुख्य रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामास्तव विभागाव्दारे तयार करण्यात आलेल्या रू. ६९,६८,२८५/– रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करून निविदा काढण्याचा व या आर्थिक वर्षात पद क्रं. ३७० (A२२००१३३०८०१) अंतर्गत तरतुद मुक्त करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक ४३१:–** प्रभाग क्रं. ३७ 'ड' अंतर्गत सेंट्रल एक्साइज कॉलनी परिसर
**{लोककर्म झोन १}** विविध ठिकाणी रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामास्तव निविदा मागविली असता एकुण चार (४) निविदा प्राप्त झाल्या असुन मे. अमृता कन्स्ट्रक्शन यांची मुळ प्राकलनीय दरापेक्षा १०.०० टक्के कमी दराची रू. २६,९९,९११/– रकमेची निम्नतम निविदा मंजूर

करणे तसेच सदरील खर्च पद क्रं. A२२००१३३०८०३ मधुन करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक ४३२:—** प्रभाग क्रं. ३७ 'ड' अंतर्गत जेतवन सोसायटी व विविध
**{लोककर्म झोन १}** ठिकाणी रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामास्तव निविदा मागविली असता एकुण पाच (५) निविदा प्राप्त झाल्या असुन मे. अमृता कन्स्ट्रक्शन यांची मुळ प्राकलनीय दरापेक्षा १०.०० टक्के कमी दराची रू. २६,९९,९६१/— रकमेची निम्नतम निविदा मंजूर करणे तसेच सदरील खर्च पद क्रं. A२२००१३३०८०३ मधुन करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक ४३३:—** प्रभाग क्रं. ३७ 'ड' अंतर्गत येथील लोकसेवा नगर परिसर
**{लोककर्म झोन १}** आणि विविध ठिकाणी रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामास्तव निविदा मागविली असता एकुण चार (४) निविदा प्राप्त झाल्या असुन मे. अमृता कन्स्ट्रक्शन यांची मुळ प्राकलनीय दरापेक्षा १०.६० टक्के कमी दराची रू. २६,८१,९१२/— रकमेची निम्नतम निविदा मंजूर करणे तसेच सदरील खर्च पद क्रं. A२२००१३३०८०३ मधुन करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक ४३४:—** स्थायी समिती ठराव क्र. 77, दिनांक 23/6/2017 मधील अटी व
**{समाज कल्यान विभाग}** शर्तीनुसार जिवन तरूण विमा योजने अंतर्गत लाडली लक्ष्मी विमा योजनेचा दर सहा महिन्याचा प्रगती अहवाल स्थायी समिती समोर सादर करणे अनिवार्य आहे. त्याअनुषंगाने विभागामार्फत लाडली लक्ष्मी योजना राबविण्याकरिता निवड करण्यात आलेल्या अभिकर्ता मार्फत सदर योजनेचा प्रगती अहवाल मागविण्यात आलेला असुन उक्त प्रगती अहवाल स्थायी समितीसमोर माहितीकरिता ठेवण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन अहवालाची एकमताने नोंद घेतली.

**ठराव क्रमांक ४३५:—** नागपूर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील विद्युत विभागातील, एल.
**{स्थापना विभाग}** ई. डी. पथदिवे, सोलर पॉवर प्लांट व इतर प्रकल्प राबविण्याकरिता जाहिरात क्र. 11/पी. आर. दि. 05/04/2018 च्या अनुषंगाने व गठीत करण्यात आलेल्या निवड समितीने थेट मुलाखतीव्दारे प्रत्यक्ष मुलाखती घेवून निवड करण्यात आलेल्या श्री. सलीम इकबाल, सेवानिवृत्त सहा. अभियंता (इलेक्ट्रीकल), विद्युत विभाग, म.न.पा. नागपूर यांना करार पध्दतीवर शासन निर्णय दि. 17 डिसेंबर, 2016 मधील तरतुदीनुसार मासिक पारिश्रमिक तत्वावर, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 53 (3) मधील तरतुदीनुसार, करार पध्दतीने ''प्रमाणीत विद्युत व्यवस्थापक'' (Certified Energy Manager) म्हणून प्रथमतः 6 महिन्याकरिता नियुक्त करण्यात आले, त्यांचा नियुक्ती कालावधी दि. 22/10/2018 रोजी संपुष्टात येणार आहे. त्यांची आवश्यकता असल्यामुळे, एक दिवसाचा तांत्रिक खंड देवून दि. 24/10/2018 पासून पुढील 6 महिन्याकरिता, मुदतवाढ देण्याचा व याकरिता रू. 2,,55,000/— इतका खर्च येण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक ४३६:—** स्थायी समिती ठराव क्र .280 दिनांक 29/11/2018
**{समाज कल्यान विभाग}** मधील अटी व शर्तीनुसार स्व.अनुसयाबाई काळे स्मृती महिला समुपदेशन केंद्र व्दारा संचालीत महिला समुपदेशन केंद्राचा दिनांक 04/04/2018 ते 30/06/2018 या कालावधीचा प्रगती अहवाल मागविण्यात आलेला असुन उक्त प्रगती अहवाल स्थायी समितीसमोर ठेवण्याकरीता प्रश्न समितीने विचारात घेऊन प्रगती अहवालाची एकमताने नोंद घेतली.

**ठराव क्रमांक ४३७:—** जेट पॅचर मशिनद्वारे नागपूर शहरातील डांबरी रस्त्यावरील
**{हॉट मिक्स प्लॉन्ट}** खड्डयाची दूरुस्ती करण्याच्या कामाकरीता रु. 4,99,74,960/— (रू. चार कोटी नव्यानव लक्ष चौ—यात्तर हजार नवशे साठ) राशीचे प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा

व तदनंतर निविदा बोलविण्याचा तसेच पद क्र. A220014330805 अंतर्गत तरतुद मुक्त करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन खालील सुचनेसह विषयास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

१) प्रस्तावित निविदा ही पाच वर्षाकरिता काढण्यात याव्या व प्रत्येक वर्षी जे काम अर्थसंकल्पीय तरतुदीच्या उपलब्धतेप्रमाणे त्या—त्या आर्थिक वर्षातील तरतुदीप्रमाणे मुक्त करण्यात येईल त्यामुळे दर कमी होऊन मनपाची आर्थिक बचत होऊन प्रथम वर्षाची कार्यादेश राशी ही रु. ४,९९,७४,९६०/— पर्यंत सिमीत राहिल या राशीस वित्तीय मान्यता प्रदान करण्यात येते.

२) यापुर्वी स्थायी समितीने या विषयाचे अनुषंगाने ज्या ठरावास मान्यता प्रदान केली त्यातील अटी व शर्ती ही निविदा प्रसिद्ध करतांना त्याचा समावेश करुन निविदा काढाव्या

<u>ठराव क्रमांक ४३८</u>:— {आरोग्य विभाग} आरोग्य विभागातील कर्मचाऱ्यांची संख्याबळ व आरोग्य विभागाचे महत्व लक्षात घेता, म.न.पा. ठराव क्र. ११९, दि. २९/०७/२०१५ नुसार उपद्रव शोध पथकात (NDS) १) Squad Leader यांचे १, २) Squad Zonal Leader यांची १०, ३) Security Assistant यांची ७६, अशी एकूण ८७ पदे कंत्राटी तत्वावर प्रथमत: ११ महिन्याच्या कालावधी करीता नियमित स्वरुपाचे कामासाठी नियुक्त न करता ११ महिण्याचा कालावधी करीता कामासाठी जाहीरात क्र. २२३/पी.आर./२०१७ दि. ३०/०९/२०१७ अन्वये जाहिरात देण्यात आली होती.

त्या अनुषंगाने त्यावेळेस मौखिक चाचणी अंतर्गत नियुक्त करण्यात आलेल्या लष्करी सेवानिवृत्त कर्मचारी यांना ११ महिण्याचा कालावधी करीता कंत्राटी स्वरुपात नियुक्त करण्यात आले होते. त्यावेळेस उपरोक्त प्रमाणे नियुक्त करण्यात आलेल्या लष्करी सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांपैकी आजच्या तारखेत खालील तक्त्यात नमुद कर्मचारी कार्यरत आहेत.

| अ. क्र. | पदनाम | कार्यरत |
|---|---|---|
| १ | Squad Leader (विशेष कार्यअधिकारी) | १ |
| २ | Zonal Squad Leader (सुपरवायसर) | ६ |
| ३ | Security Assistance (रक्षक) | ३७ |
| | एकूण | ४४ |

दि. ३०/११/२०१८ रोजी उपरोक्त तालीकामध्ये नमुद कार्यरत ४४ लष्करी सेवानिवृत्त कर्मचारी यांना दि. ०१/१२/२०१७ रोजी दिलेल्या नियुक्तीच्या अनुषंगाने दि. ०१/१२/२०१७ ते दि. ३१/१०/२०१८ या ११ महिण्याच्या कालावधीत त्यांचे मार्फत रु. १,३०,१२,०००/— चे दंड वसुल करण्यात आले असून त्यांना ११ महिण्यात रु. १,१८,०२,७६६/— देयक देण्यात आले. कंत्राटी तत्वावर प्रथमत: ११ महिण्याच्या कालावधीचा कार्यकाळ पुर्ण होत असल्याने त्या सर्व ४४ लष्करी सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांची सेवा समाधानकारक असल्याने पुढेही सुरु (Continue) ठेवण्याकरीता कार्यालयातर्फे करण्यात आलेली शिफारस मा. आयुक्त यांनी दि. ३०/१०/२०१८ रोजी मान्य केली आहे.

तसेच मा. अति. आयुक्त व मा. आरोग्य अधिकारी यांचे सोबत दि. ३१/१०/२०१८ रोजी झालेल्या चर्चेनुसार उपरोक्त ४४ लष्करी सेवानिवृत्त कर्मचारी यांचे प्रथम ११ महिण्याच्या कालावधीचा कार्यकाळ पुर्ण झाल्याने त्यांना ४ दिवसांचे अवकाश देवून पुन्हा दि. ०५/११/२०१८ रोजी पासून कामावर परत घेणे असे सुचविले. त्या अनुषंगाने दि. ०४/११/२०१८ रोजी मा. आरोग्य अधिकारी व (NDS) प्रमुख विशेष कार्य अधिकारी (Squad Leader) यांचे दरम्यान दुरध्वनीवर झालेल्या संवाद नुसार आज दि. ०५/११/२०१८ रोजी (NDS) अंतर्गत कार्यरत ४४ लष्करी सेवानिवृत्त कर्मचारी सकाळी ८.०० वाजता कामावर रुजु झाले आहे.

सबब ११ महिण्याच्या कालावधीचा कार्यकाळ पुर्ण झालेल्या त्या सर्व ४४ लष्करी सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांची सेवा पुढेही सुरु ठेवण्याकरीता कार्योत्तर मंजुरीचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक ४३९</u>:— dPps ik.kh iqjoBk dsanz] uosxkao [kSjh ;sFkhy iaihax LVs'kupk ikoj QWDVj {जलप्रदाय विभाग} ok<fo.;kdjhrk 3-3KV RMU iWuylg dWisflVj c¡d iqjoBk dj.ks] clfo.ks rlsp ifj{k.k o dk;kZUo;u dj.ks ;k dkekdjhrk :- 4736605@& ps [kpkZl iz'kkldh; ekU;rk rlsp fu;fer fufonk cksykfo.;kl eatqjh ns.;kpk प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक ४४०</u>:— प्रभाग क्र. ५ अंतर्गत श्री. दिनेश जनरल स्टोर्स ते दुर्गा मंदिर {लोककर्म झोन ७} राणी दुर्गावती चौक येथे रस्त्यांचे सिमेंटीकरण करण्याच्या कामास्तव रु.३२,८२,६७३/- रकमेच्या प्राकलनास मंजूरी प्रदान करून निविदा मागविण्यास मान्यता देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक ४४१</u>:— प्रभाग १५ ड येथिल धरमपेठ खरे टाउन भागात रस्त्यांचे रूंदिकरण {लोककर्म झोन २} व डांबरीकरण करणे या कामाच्या रू. ४६,७६,८५७/— चा प्राकलनास मंजुरी देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक ४४२</u>:— प्रभाग क्र. ३७ , विद्या विहार कॉलोनी येथे आय ब्लॉक {कार्य. अभि.(प्रकल्प)} लावणे या कामाकरीता रूपये २५९८६२६ /— च्या निविदा राशीचे शासकीय (मुख्यमंत्री निधी) विशेष निधी अंतर्गत करावयाचे कामास्तव निविदा मागविल्या असता, प्राप्त निविदापैकी निम्नतम निविदाकार मे. आर.बी. केवलरामानी यांची प्राकलनिय दरापेक्षा १४.५७ टक्के प्रमाणे कमी दराची रूपये २२२०००६/— निविदा प्राप्त झाली आहे. या कामाची प्रशासकीय मान्यता रक्कम रूपये २९४९४४१ /— असुन या कामावर निविदाकारांचा देकार रूपये २२२०००६/—, १२ टक्के जी.एस.टी. (G.S.T.) रूपये २६६४०१ /— असे एकुण रूपये २४८६४०७ /— ची निविदा मंजुरीचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक ४४३</u>:— नागपूर महानगरपालिकेच्या केंन्द्रीय कार्यालयाकरीता जनरेटरचा पुरवठा {विद्युत विभाग} करून उभारणी करण्याकरीता में. चांडक इलेक्ट्रिक कं., नागपूर यांची प्राकलनीय राशीपेक्षा 5.12% ने कमी असलेली रू. 72,41,227/— ची निम्नतम दराची निविदा मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक ४४४</u>:— नागपूर महानगरपालिका सिव्हील लाईन्स येथील मुख्यालयातील जुने { विद्युत विभाग} सबस्टेशन नविन सबस्टेशन नविन सबस्टेशनच्या इमारतीमध्ये स्थानांतरीत करून क्षमता वाढविणे व मुख्यालयातील इमारतीमधील विद्युत पुरवठाच्या कामांचे नुतनीकरण करण्याकरीता में. बालाजी असोशिएटस्, नागपूर यांची प्राकलनीय रकमेच्या तुलनेत 7.20% ने कमी असलेली रू. 1,52,03,563/— ची निम्मनतम दराची एकमेव निविदा मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक ४४५</u>:— नागपूर म.न.पा. अंतर्गत विवीध दहनघाटावर शवदहनासाठी {आरोग्य विभाग} प्रति शव दहन (१० कि.ग्रॅ. शेणाच्या गोवऱ्या मनुष्यबळ, वजन काटा शरण रचुण देण्यासह) पुरवठा करण्याबाबत मा. स्थायी समिती ठराव क्र. १७६ दि. १९/०७/२०१८ अन्वये निविदा मागविण्यात आल्या असता चार निविदाकारांच्या निविदा प्राप्त झाल्या असून त्यात निम्नतम दर रु. ११८/ प्रति शव दहन प्रमाणे मे. अवस्थि ट्रेडर्स, नागपूर यांचे प्राप्त झालेले आहे.

निविदेमधील प्राप्त निम्नतम दरानुसार वार्षिक दहनास अंदाजीत १४,५०० शवदहन प्रक्रियेस रु. १७,११,०००/— खर्च अपेक्षित राहील. निविदा दोन वर्षाच्या कालावधीसाठी मान्य राहतील. हा खर्च आय—व्यय पद क्र. A 23501141211 मधुन भागविण्यात येईल.

तसेच उपरोक्त स्थायी समिती ठराव क्रं. १७६ दिनांक १९/०७/२०१८ च्या मंजुरीनुसार या अगोदर मे. अवस्थि ट्रेडर्स, नागपूर यांचे गोवरी पुरवठा बाबतचे देयक ३१ मे २०१८ पर्यंन्त प्रदान

करण्यात आलेले आहे. हे कार्य करणे अत्यंत आवश्यक असल्यामुळे संबंधीत कंत्राटदाराकडून जुन्याच दरावर गोवरी पुरवठा सुरु ठेवण्यात आला आहे.

यास्तव नविन निविदा दर मंजूर होईस्तोवर जुन्या मंजुर दरावर काम सुरु ठेवण्याचा तसेच मागिल पाच ते सहा महिण्याच्या कालावधीत झालेल्या खर्चास कार्योत्तर मंजुरी देण्याचा आणि पुढील दोन वर्षाकरिता रु. ११८ प्रमाणे प्रति शव दहन (१० कि.ग्रॅ. शेणाच्या गोवऱ्या मनुष्यबळ, वजन काटा शरण रचुण देण्यासह) मान्यता प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक ४४६</u>:—** {कार्य. अभि.(प्रकल्प)} प्रभाग क्र. ३७, टेलिकॉम नगर येथे आय ब्लॉक लावणे रूपये ६२१८६२०/— च्या निविदा राशीचे शासकीय (मुख्यमंत्री निधी) विशेष निधी अंतर्गत करावयाचे कामास्तव निविदा मागविल्या असता, प्राप्त निविदा पैकी निम्नतम निविदाकार मे, विश्व दिप एर्टरप्राइजेस यांची प्राकलनिय दरापेक्षा १७.८२ टक्के प्रमाणे कमी दराची रूपये ५११०४६२/— निविदा प्राप्त झाली आहे. या कामाची प्र. मा. रक्कम रूपये ७०५८१३४/— असुन या कामावर निविदाकाराचा देकार रूपये ५११०४६२/— + १२ टक्के जीएसटी रूपये ६१३२५५/— असे एकुण रूपये ५७२३७१७/— ची निविदा मंजुरीचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक ४४७</u>:—** {जनसंपर्क विभाग} नागपूर महानगरपालिकेच्या विविध विभागाच्या निविदा सूचना, जाहीर सूचना, दर्शनी जाहिराती व अन्य जाहिराती तयार करून वर्तमानपत्रे, रेडीओ, टी.व्ही. (प्रिंट मिडीया व इलेक्ट्रॉनिक मिडीया) इत्यादी प्रसार माध्यमाव्दारे प्रसारित करण्यासाठी म. न.पा.च्या पॅनलवर नव्याने एजन्सीची नियुक्ती करण्यासाठी निविदा बोलवावयाच्या होत्या. परंतु मेसर्स एडीटर्स फोरम, मुंबई यांनी मुंबई येथे मा.उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल केली असल्यामुळे व कायद्याचे सल्लागाराचे अभिप्राय लक्षात घेता सद्यस्थितीत जाहिरातीचे निर्मिती व वितरणासाठी एजन्सी नियुक्तीकरीता निविदा मागविणे उचित होणार नसून म.न.पा.तर्फे थेट जाहिराती तयार करून प्रसिध्दी करीता देणे अभिप्रेत आहे. मात्र त्याकरिता आवश्यक यंत्रणा सद्या उपलब्ध नसून याबाबत नियोजन करण्यात येईल.

तथापी जाहिरातीची कामे खोळंबू नये म्हणून स्थायी समिती ठराव क्र.160 दि. 09.07.2018 नुसार दोन महिन्याकरीता नियुक्ती केलेल्या दुसऱ्या क्रमांकावरील एजन्सी मेसर्स अमित ॲडव्हरटायझिंग एजन्सी व मेसर्स प्रॉफीट ॲडव्हरटायझर्स (इं.) प्रा.लि.नागपूर यांना पर्यायी व्यवस्था होईपर्यंत त्यांना जून्याच अटी व शर्तीवर पुढील तीन महिन्याकरीता जाहिरातीची कामे आळी—पाळीने विभागून देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

सभापती :— एल.ए.डी. लाईट के संदर्भ में निगम आयुक्त से चर्चा हुई थी इस संदर्भ मे कितने दिन मे कारवाई शुरु कि जायेंगी।

श्रीमती कल्पना मेश्राम (कनिष्ठ अभियंता) :— मा.सभापती महोदय, या संदर्भात ठेकेदार लोकांशी चर्चा झालेली आहे, एक लक्ष एल.ए.डी.लाईट 1 मे पर्यंत शहरात लावण्यांत येईल.

सभापती :— मा.सदस्यों को मालुम होना चाहिये कि, उन प्रभागो मे कब तक एल.ए.डी. लाईट लेगेगे, अभी विभाग व्दारा दी गयी जानकारी के अनुरूप 1 मे 2019 तक एल.ए.डी. लाईट लग जायेगी। टॅक्स के संदर्भ मे जानकारी दी जाये।

श्री.मिलींद मेश्राम (सहा.आयुक्त, कर व कर आकारणी विभाग) :— मा.सभापती महोदय, मालमत्ता कर से 120 कोटी रुपये प्राप्त हुए है। झोन को जो टारगेट दिया गया है वह पुरा करने के दृष्टी से प्रयत्न शुरु है। 5 लाख के उपर जो डिफॉल्टर है उनपर कारवाई करने के दृष्टीसे वारंट कारवाई, हुकुमनामा, जाहिरनामा, प्रसिध्द करने के कार्य शुरु है।

सभापती :— मालमत्ता कर के संदर्भ मे जो केसेस कोर्ट मे प्रलंबित है। हम जिनपर कारवाई नही कर सकते उनकी यादी बनाकर लिगल सेल से इस संदर्भ मे चर्चा करके यह केसेस समाप्त करने चाहिये। इस वजह से काफी ऐरिअर्स रुका हुआ है। वह वसुल करने का हमने प्रयास करना चाहिये।

श्री.मिलींद मेश्राम (सहा.आयुक्त, कर व कर आकारणी विभाग) :– मा.सभापती महोदय, जिन कसेसे मे न्यायालयीन प्रक्रीया शुरु है, जब तक वह डिपॉझीट अमाउंट जमा नही करते तबतक वह कोर्ट मे नही जा सकते।

सभापती :– इस संदर्भ में लिगल सेल से चर्चा करके यह सारी केसेस का तुरंत निपटारा किया जाये। थकबाकी की जो अमांउट है उसकी शास्ती छोडकर बाद मे उन्होने कोर्ट मे जाना चाहियें मुझे लगता है हम कही तो भी इस सेक्शन को इग्नोर कर रहे है। इस संदर्भ में जो 5 लाख के उपर थकबाकीदार है उनमे से कितने लोगोंपर कोर्ट केसेस चालु है, उसकी अमाउंट क्या है। और शास्ती क्या है। लास्ट टाईम उन लोगों ने कब टॅक्स भरा था यह सारी जानकारी एक एक्सेल शिटव्दारा स्थायी समिती को 15 दिन के अंदर सादर कि जाए। मालमत्ता कर के संदर्भ में मार्च महिने तक विभाग को दिया गया टारगेट पुरा होना चाहियें।

श्रीमती कल्पना कुंभलकर :– मा.सभापती महोदय, माझ्या घरी आज पिण्याच्या पाण्याचे नळ आले नाही. या अनुषंगाने मी ओ.सी.डब्लु. च्या अधिका–यांना फोन केला असता त्यांनी माझा फोन उचचला नाही.

श्री.मनोज सांगोळे :– मा.सभापती महोदय, सुवर्ण नगर, गुरुनानक कॉलेज, केजीएन सोसायटी समोर 6 इंचीची लाईन फुटलेली आहे. त्यातुन मोठया प्रमाणात पिण्याचे पाणी वाहत आहे. लाईन दुरुस्ती करण्यासंदर्भात तक्रार केली असता ओ.सी.डब्लु. विभागाकडुन रिपेरींगचे सामान उपलब्ध करुन देण्यात येत नाही. मा.पालकमंत्री महोदयांनी पाण्याचा अपव्यय करणा–यांच्या विरोधात कडक कारवाई करण्यात येईल असे सूचित केले आहे.

श्री.जुल्फेखार भुट्टो :– मा.सभापती महोदय, ओ.सी.डब्लु. के कर्मचारी मा.स्थायी समिती सदस्य का फोन नही उठाते, जब मा.सदस्यों को इतनी तकलीफ होती है तो आम नागरिक को कितनी तकलीफ होती होंगी।

सभापती :– मा.सदस्या श्रीमती कल्पना कुंभलकर व मा.सदस्य श्री.मनोज सांगोळे इनके प्रभाग मे ओ.सी.डब्लु. और जलप्रदाय विभाग के डेलीगेट्सने तुरंत व्हीजीट देनी चाहिये। अगली स्थायी समिती की सभा मे डेलीगेट्स ने उपस्थित रहना चाहिये। पिछली बार निगम आयुक्त से चर्चा हई थी की सिमेंट रोड के पैसे सप्टेबर 2018 तक क्लीअर किये जायेंगे। हुडकेश्वर और नरसाळा का बिल क्लीअर किया जायेंगा। महानगरपालिका के देयक जुलै 2018 तक क्लीअर किये जायेगे। जिन लोगों के पैसे बकाया है उनके 2 दिन मे सभी लोगों को पेमेंट किया जायेंगा इस संदर्भ अकाउंट विभाग ने क्या कारवाई की है यह सारी जानकारी एक्सेल शिट मे तयार करके स्थायी समिती को सादर कि जायें। 100 करोड के आसपास ठेकेदारों को रिलीज करने की बात हुई थी मा.सदस्यों के वार्ड विकासों की फाईल बडे पैमाने मे रुकी हुयी है। कितने फाईल क्लीअर हुयी है, और कितनी फाईल प्रलंबित है।

श्री.ठाकरे (अति.आयुक्त) :– मा.सभापती महोदय, माझ्याकडे मा.सदस्यांच्या वार्ड विकासाच्या संदर्भातील कोणतीही नस्ती प्रलंबित नाही. याची माहिती मी पुढच्या स्थायी समितीच्या सभेत सादर करेल.

सभापती :– महानगरपालिका की आर्थिक परिस्थिती धिरे धिरे सुधारने के प्रयत्न शुरु है। मा. सदस्योंने जो काम वार्ड फंड से सुचित किये है वह काम तुरंत पुरे किये जाने चाहिये। जिन कामों के लिये बजट मे तरतुद उपलब्ध है और जिन कामों के लिये प्राव्हीजन दिया गया है वह काम नही अटकाने चाहियें। जहा लिगल अडचण होंगी वहा बात अलग है। शहर के डेव्हलपमेंट के काम नही रुकने चाहियें इस संदर्भ मे पिछली बार आयुक्त महोदय से चर्चा हुयी थी। उन्होने उस वक्त सारे काम करने के संदर्भ मे आदेश दिये थे। हम इसके बाद यह बात नही सुनेंगे। जी.एस.टी का अनुदान 86.50 लाख रुपये प्राप्त हुआ है। मा.मुख्यमंत्री महोदय के प्रयत्नो से 175 कोटी के आसपास अनुदान मिल रहा है। मा.पालकमंत्री महोदय ने भी 50 करोड रुपये नालों के काम के लिये देने का आश्वासन दिया है। इस संदर्भ मे हर झोन से नालों के कामों की जानकारी बुलायी जायें। जो बडी अमाउंट के काम है उसके लिये शासन की तरफ से निधी मांगी जायेंगी। और जो छोटे काम है वह हम अपने निधी से कर सकते है।

श्री.मनोज सांगोळे :– मा.सभापती महोदय, 20 लाख रुपयों के कामो की प्रशासकीय मंजूरी की बात कों क्लीअर कर दिया तो बहोत अच्छा रहेंगा।

श्री.ठाकरे (अति.आयुक्त) :– मा.सभापती महोदय, मला असे वाटते की माझ्या संदर्भात थोडासा गैरसमज होत आहे. मला नेहमी सांगण्यात येते की, मी विकास कामाच्या फाईली थांबवित आहे. पण

फाईल थांबविण्यास माझा कोणताही इंटरेस्ट नाही. मी विकास कामाच्या सर्व फाईल ताबडतोब क्लीअर करण्याचे काम करतो. काही ठिकाणी अडचण असल्यास विभाग प्रमुखांकडुन त्याची माहिती घेवुन ती फाईल निकाली काढण्यात येते. आज मी दोन ठिकाणी भेटी दिल्या असता त्या जागी आय ब्लॉक लावण्याचे काम सुरु होते परंतु त्या ठिकाणी ऑलरेडी सिमेंटीकरण झाले होते. मी अधिका–यांना बोलावुन या संदर्भात माहिती घेतली असे जर काम राहिले तर याची काळजी आपण घेतली पाहिजे. अशा ठिकाणी पैसे खर्च करणे बरोबर नाही. कनिष्ठ अभियंता यांचा कन्सेप्ट क्लीअर असला पाहिजे. या अनुषंगाने विभागाकडुन कारवाई सुरु करण्यात येईल. कालच्या जनसंवाद कार्यक्रमामध्ये मा.पालकमंत्री महोदयांनी जवळपास 23 कोटी व 50 कोटी रुपये नाल्याच्या भिंतीच्या कामाला देण्याचे आश्वासित केले आहे. या कामाच्या संदर्भात विभागाकडुन आवश्यक ती कारवाई करण्यात येईल.

श्री.जुल्फेखार भुट्टो :– मा.सभापती महोदय, हमारे क्षेत्र में ट्रंक लाईन काफी दिनों से ओव्हर फ्लो हो रही है। जिसकी वहज से 1000 मकानों मे दुषित पानी आ रहा है। वहा डि.पी. प्लॅन की हिसाब से 2 करोड रुपयों का काम होना चाहिये। मै सभापती स्थायी समिती और निगम आयुक्त से आग्रह करता हु की जो डि.पी. प्लॅन बना है। उस दिशा मे काम होना चाहिये। वह ट्रंक लाईन अंग्रेजों के जमाने से डाली गयी थी।

सभापती :– नालों के संदर्भ में मा.पालकमंत्री महोदय ने निधी उपलब्ध कराने का आश्वासन दिया है। इस संदर्भ मे शासन से निधी मांगा जायेंगा वह काम महानगरपालिका के निधी से करना संभव नही है। इस संदर्भ मे तुरंत सभा लेकर सहा.आयुक्त, कार्यकारी अभियंता इनको नालों और ट्रंक लाईन के रिक्वायरमेंट की हिसाब से फाईल बनाने के आदेश दिये जाये। उन कामों के इस्टीमेट 3 दिन के अंदर अगली स्थायी समिती की पास मे भेजना चाहिये। ऐसे शहर मे बहोत सारे नाले है जिनकी चौढाई कम है जिसकी वहज से पोकलॅन्ड अंदर नही जा सकता। उसी प्रकार से नालो के आजुबाजु मे बडे पैमानेपर अतिक्रमण किया है उन सारी चिजों को देखते हुयी एक लॉग टर्म पॉलिसी तयार करना चाहिये। और उसी तरह से जो आय.आर.डी.पी. की लाईन है वह म.न.पा. निधी से करना चाहिये। वह सारी ड्रेन खोलने का काम विभागीय स्तरपर होना चाहिये। यह काम शासन के निधी से नही होना चाहिये। संबंधित अधिकारीयोंने आय.आर.डी.पी. की ड्रेन खोलने का काम उनके स्तर पर करना चाहियें उसमे जो गंदगी जमा है उसे तुरंत साफ करना चाहिये ताकी शहर स्वच्द व सुंदर रहे।

**ठराव क्रमांक 448** :– आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

सभापती
स्थायी समिती,
महानगरपालिका,नागपूर